# साहित्य संशोधनाच्या नव्या दिशा

शाहिरी
कादंबरी
चरित्र
कथा
स्त्री चित्रण
गझल
काव्य
तौलनिक
साहित्याभ्यास
लोकसाहित्य
संतसाहित्य

## प्राचार्य डॉ. सुलक्षणा कुलकर्णी - गौरव ग्रंथ


संपादक

डॉ. भरत जाधव
डॉ. पांडुरंग ऐवळे

## प्राचार्य डॉ. सुलक्षणा कुलकर्णी - गौरव समिती

| | |
|---|---|
| प्रो. डॉ. रमेश पांडुरंग पोळ | अध्यक्ष |
| डॉ. धनंजय निंबाळकर | उपाध्यक्ष |
| डॉ. विजया पवार | सचिव |
| डॉ. बाबासाहेब नाईक | सहसचिव |
| डॉ. संतोष लावंड | खजिनदार |
| डॉ. तानाजी पाटील | सदस्य |
| डॉ. सविता माळी | सदस्य |
| डॉ. चंदना लोखंडे | सदस्य |
| सौ. सुनिता पाटील/साळुंखे | सदस्य |
| सौ. शुभांगी मुळीक/डुबल | सदस्य |
| डॉ. रेखा खानापुरे | सदस्य |
| प्रा. निलम पाटील | सदस्य |
| डॉ. भरत जाधव | संपादक |
| डॉ. पांडुरंग ऐवळे | संपादक |

# अनुक्रमणिका

१. चिं. त्र्यं. खानोलकरांच्या कथात्मक साहित्यातील नियतीचे चित्रण
– प्राचार्य डॉ. सुलक्षणा कुलकर्णी २१

२. जी. ए. कुलकर्णी यांच्या कथात्मक साहित्यातील नियतीचे चित्रण
– डॉ. सुलक्षणा कुलकर्णी ३२

३. मराठी साहित्यात प्रतिबिंबित झालेले संत तुकारामांचे व्यक्तिमत्व
– प्रो. डॉ. रमेश पांडुरंग पोळ ४५

४. धनगरी ओवीगीतांचा अभ्यास
– प्रा. डॉ. तानाजी ज्ञानदेव पाटील ५१

५. शाहिरी सोलापुरी
– प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे ५९

६. व्यंकटेश माडगूळकर आणि फणीश्वरनाथ रेणु यांच्या कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास
– डॉ. भरत भिमराव जाधव ६६

७. मंगेश पाडगांवकर आणि सुरेश भट यांच्या गझलांचा तुलनात्मक अभ्यास
– प्रा. डॉ. सविता अशोक माळी ७५

८. १९८५ नंतरच्या मराठी गझल वाङ्मयाचे मूल्यमापन
– प्रा. डॉ. धनंजय जालिंदर निंबाळकर ८६

९. विभावरी शिरुरकर यांच्या साहित्यातील स्त्री चित्रण
– प्रा. डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक १०२

१०. अर्वाचीन मराठी निबंधातील स्त्री सुधारणा विषयक विचार (इ.स १८३२ ते १९२०)
– डॉ. सौ. चंदना अनिल लोखंडे १०९

# मंगेश पाडगांवकर आणि सुरेश भट यांच्या गझलांचा तुलनात्मक अभ्यास

**प्रा. डॉ. सविता अशोक माळी**

मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय कडेगाव फोन नं. ९७६६४५८४७६

मंगेश पाडगांवकर आणि सुरेश भट यांच्या गझलांचा तुलनात्मक अभ्यास असा विषय मी M.phil साठी निवडला. प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना विषयाची निवड करण्यापासून ते प्रबंधिकेला पूर्णत्व देण्यापर्यंत मला माझ्या मार्गदर्शक आदरणीय प्राचार्य डॉ. सुलक्षणा कुलकर्णी मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. मी मॅडमची १९९९ पासूनची विद्यार्थिनी अगदी बी. ए. भाग १ पासून मला मॅडम शिकवायला होत्या. वर्गात मॅडमनी शिकविलेल्या कविता आजही मला जशाच्या तशा आठवतात. मॅडमनी कवितेबद्दल माझ्या मनात निर्माण केलेली आवड मला पुढे एम. फील च्यावेळी विषय निवडताना झाली. प्रबंधिकेचा विषय निश्चित करताना त्यामध्ये आपली आवड असेल तर तो अभ्यास आपण अधिक चांगल्या प्रकारे करू शकतो. माझी कवितेविषयीची आवड माझ्या मार्गदर्शक प्राचार्या डॉ. सुलक्षणा कुलकर्णी यांनी बरोबर ओळखली. त्यामुळे त्यांनी प्रस्तुत विषय मला सांगितला. त्याबरोबर मी देखील त्याला होकार दिला आणि या विषयात अभ्यास करण्याची संधी मला मिळाली.

तौलनिक साहित्याभ्यास ही साहित्याच्या अभ्यासाची एक नवी शाखा आहे. एखाद्या साहित्यकृतीचे वेगळेपण लक्षात घ्यायचे असेल तर इतर साहित्यकृतीपेक्षा ती कशी व किती वेगळी आहे. हे तुलना करूनच ठरवावे लागते. निरनिराळ्या साहित्यकृतीतील साम्यशोधन व भेदनिर्देशन तुलनेनेच शक्य होते. एका साहित्यकृतीची दुसऱ्या साहित्यकृतीशी केलेली तुलना हे तुलनेचे मुळ रूप. पण एका साहित्यकृतीची दोन किंवा अधिक लेखक, वाङ्मय प्रकार वाङ्मयीन प्रवाह, परंपरा यांचा विचार केल्यास तुलनेचे क्षेत्र विस्तारत जाते.

सुरेश भट व मंगेश पाडगांवकर हे कवी दोन वेगवेगळ्या संप्रदायातील कवी आहेत. मंगेश पाडगांवकर हे माधव जूलियन संप्रदायातील आहेत. तर सुरेश भट हे नवे 'युग पुरूष' म्हणून ओळखले जातात. त्यांनी मराठीमध्ये नूतन गझल युगाचा प्रारंभ केला. त्याचा विकास घडविण्यासाठी ते ठामपणे उभे ठाकलेले आहेत. भटांच्या तुलनेने पाडगांवकरांनी लिहिलेल्या गझलांची संख्या कमी असली तरी त्यांच्या काही गझल

भट संप्रदायातील गझलांशी तंतोतंत जुळतात, तर काही माधव संप्रदायातील गझलांशी जुळतात. सुरेश भट म्हटंले की आपणांस आठवते ती त्यांची गझल आणि निसर्गातून भावजीवन व्यक्त करणारे कवी म्हटंले की आपल्या डोळ्यांसमोर मंगेश पाडगांवकर येतात.

या दोन संप्रदायातील गझलकांराची गझल, तिची परंपरा तिचे स्वरूप, मराठीतील गझलांचा परामर्श येऊन गझलची वैशिष्टये कोणती ? यांचा अभ्यास प्रबंधिकेमध्ये केला आहे.

गझल म्हणजे एकयमकी शृंगारगीत.[१] गझल म्हणजे एकाच वृत्तात समान यमकांनी बांधलेल्या, पण कोणत्याही विषयाचे बंधन नसलेल्या अनेक कवितांची बांधणी होय.[२] एकाच वृत्तातील एकच यमक (काफिया) व अंत्ययमक (रदिफ) असलेल्या प्रत्येकी २-२ ओळींच्या किमान पाच किंवा त्याहून अधिक कवितांची बांधणी म्हणजे गझल[३]

'मूळ अरबी शब्द 'गझल' आहे. तोही स्त्रीलिंगी शब्द आहे. हा शब्द जसाच्या तसा फारसीत आला. तोही स्त्रीलिंगी म्हणूनच आणि मराठीत 'गज़ल' ह्या शब्दाला हे रूप मिळाले. गझलेचा एकूण पिंड, तिचा नखरा व नजाकत पाहता तिचे लिंगपरीवर्तन करणे योग्य नव्हे[४]

'गझल' या शब्दाचा अर्थ असा आहे की, प्रेमालाप करणे, प्रेयसीस उद्देशून बोलणे, आत्तापर्यंत केलेल्या अभ्यासावरून व व्याख्यांवरून असे लक्षात आले की, गझलचा प्रमुख विषय प्रेम व शृंगार एवढाचा मर्यादित आहे. परंतु हा विचार तितकासा योग्य नाही, कारण गझलमध्ये अनेक विषय व्यक्त करता येतात. मात्र त्या विषयाची अभिव्यक्ती ही गझलवृत्तात असावी लागते. म्हणूनच गझलला विषयाचे बंधन नसून गझलविषयीच्या नियमांचे बंधन आहे.

गज़लांचे सर्व चरण वृत्तदृष्टया सारखे असतात. आणि त्यात प्रारंभापासून शेवटपर्यंत त्याच अक्षराचे यमक आले पाहिजे असा नियम असतो. गज़लातील द्विपदींना शेर म्हणतात. अशा पाच ते सतरा शेरांच्या समूहाला गज़ल म्हणतात. नेहमीची कविता सलग असते, तिची एक 'थीम' असते. आणि म्हणूनच ती उलगडत जाते. पण गझल मात्र कवितेप्रमाणे उलगडत नाही. कारण एकाच गझलमध्ये विविध विषय हाताळले जाऊ शकतात. प्रत्येक शेराचा आशय स्वतंत्र विषय असू शकतो. किंवा एकच संवेदना एकच भाव किंवा एकच मूड असलेले सर्व शेर असू शकतात.

गझल हा तंत्रानुसारी काव्यप्रकार आहे आणि ते तंत्र सांभाळायलाच हवं. गझलेच्या तंत्रात प्रामुख्याने वृत्त, द्विपदी, एकयमकीपणा ह्यांच्या विशिष्टत्वाला अत्यंत महत्त्व असते. 'गझल' हा वृत्तबध्द काव्यप्रकार आहे. वृत्ताला 'बहर' म्हणतात. ज्या

वृत्तात ठराविक मात्रावलींची आवर्तने असतील व त्या आवर्तनामधून खटकेबाजपणा, चटकदारपणा, तालबद्धता, गेयता, गती, वजन, लय, ऐट हे सर्व साधलेले असेल; अशा कोणत्याही एका वृत्तात गझल रचलेली असते. ह्या सर्व गोष्टी अक्षरबंध व मात्रावृत्त ह्यांच्या तुलनेने अक्षरगणवृत्तात अधिक प्रमाणात साधल्या जातात. इतर वृत्तप्रकारांच्या तुलनेने अक्षरगणवृत्तात गझल रचणे अधिक अवघड असले तरी त्यामुळेच गझलेला आटोपशीरपणा, बंदिस्तपणा, शिस्त ह्याही बाबी प्राप्त होत असतात.

माधव जुलियन यांनी गझल या काव्यप्रकाराची ओळख महाराष्ट्राला करून दिली. १९२० ते १९६५ या काळात अनेक कवींनी गझल लिहिण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यांच्यासमोर माधव जुलियनाचा आदर्श होता. पण माधव जुलियनांची गझल सर्वस्वी तंत्रशुद्ध गझल नव्हती. मराठीत परिपूर्ण गझल आणली ती सुरेश भटांनी १९६५ नंतर मात्र सुरेश भटांसारखी यशस्वी, मराठी गझलला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा 'गझलसम्राट' मिळाला. 'गझलयुग' निर्माण करण्याचे श्रेय त्यांना जाते.

सुरेश भटांनी आपल्या गझलेमधून पूर्णपणे मराठी संस्कृती, नीतिनियम, रूढी, धर्मसंकेत इत्यादींचा वापर केला आणि मराठी गझल मराठी रूपात इतकी बेमालून सजविली की ती परकीय आहे असे वाटतच नाही. योजलेल्या प्रतिमा, कल्पना, शब्द, वाक्प्रचार, म्हणी इ. ऐवज गझलेमध्ये ठाकून-ठोकून बसविलेले वाटत नाही, तर ते स्वेच्छेने आपल्या स्थानग्रहणासाठी धावून आलेले वाटतात.

एकांतिक आत्मपूजा आणि समाजाभिमुखता यातून भावूक, हळव्या ओळींना भटांनी जन्म दिला. मनाचे कोमलपण, नाजूकपण जेवढ्या मधाळ व रसाळपणे ते चित्रित करतात तेवढयाच ताकदीने ते समाजव्यवस्थेच्या विरूध्द शब्दांचे शस्त्र हाती घेताना दिसतात. त्यांची कविता खऱ्या अर्थाने माणसांची कविता आहे. तिच्यातील प्रासादिकतेने ती जनसामान्यांना अगदी आपलीच वाटते. सुरेश भटांचे एकूण पाच काव्यसंग्रह आहेत. त्या काव्यसंग्रहामध्ये सुरुवातीला गझलेचे प्रमाण कमी होते. मात्र हळूहळू त्यामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. 'रुपगंधा' (१५ मार्च १९६१), 'रंग माझा वेगळा' (१९७४), 'एल्गार' (१९८३), 'झंझावात' (१९९४), 'सप्तरंग' (२००२) या त्यांच्या काव्यसंग्रहामध्ये गझल विखुरलेल्या आहेत.

गझलांचा मुख्यविषय म्हणजे 'प्रेम', सुरेश भटांच्या गझलांमध्ये मिलनाच्या धुंदीचे जसे वर्णन आढळते. तसेच विरहवेदनेने व्याकूळ झालेल्या जीवांचे वर्णन आढळते.

उदा.- ''हा असा चंद्र........अशी रात फिरायासाठी
तुच नाहीस इथे हात धरायासाठी'' (एल्गार पृ.१६)

''तोच मी होतो गडे हा तोच मी
जो तुला आता कळाया लागलो.'' (एल्गार पृ.१०)
''तुझी फुले अन् माझे काटे
ज्याचा वाटा त्यास मिळाला ।'' (झंझावत पृ.८९)

काही गझलांमध्ये मिलनाचा अनुभव व्यक्त केला आहे. तर काही गझलांमध्ये विरहाचे दु:खही व्यक्त केले आहे.

सुरेश भटांच्या गझलांमध्ये कवींचे आयुष्य आणि आजचा समाज ह्यांची बोलकी चित्रे आणि त्यांच्या संदर्भात कवीने केलेली भाष्येच आहेत असे नाही. तर खऱ्या अर्थाने ती हृदयाचा ठाव घेणारी वास्तवदर्शी समाजचित्रेच आहेत. आपल्या गझलांमधून त्यांनी मानवी जीवनाविषयी मुक्त चिंतन केले आहे. भट 'सामान्य जनतेला' ला आपल्या गझलांचा केंद्रबिदू मानतात. कारण सामान्य जनताच आपल्या काव्याचा न्यायनिवाडा करते असे सुरेश भटांचे मत आहे. 'झंझावात' या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत सुरेश भट म्हणतात, कवी आणि त्यांच्या काव्याच्या फैसला सामान्य लोक करीत असतात. स्वत: कवी किंवा समीक्षक नव्हेत. ज्या भाषेत काव्य लिहिले जाते त्या भाषेत काव्यलेखन करणाऱ्या कवीचे सर्वोच्च न्यायालय म्हणजे ती भाषा बोलणारी सामान्य जनताच असते. इतर कवी आपल्या काव्याला निसर्गचित्रणाने सजवितात पण भट मात्र आपल्या गझला अगदी सहजतेने फुलवितात. कारण ते निसर्गापेक्षा माणसांना जास्त महत्त्व देतात. त्यांच्या गझलांचा विषय 'माणूसच' आहे. सुरेश भट म्हणतात, 'झाडे बेकार होत नसतात!' पाखरांसमोर महागाईचा प्रश्न नसतो. एखाद्या जातीय दंग्यात भर रस्त्यावर एखादे झाड कापले गेल्याचे ऐकीवात नाही. ज्यांना सत्य सोसवत नाही किंवा परवडत नाही तेच इसम साधारणपणे अशा अधांतरी निसर्गकविता लिहितात. निसर्गाचा विचारच करू नये असेही माझे म्हणणे नाही; पण आपल्या महाराष्ट्रात आतातरी आपण सर्वांनी मराठी माणसांच्या दु:खांचा व स्वप्नांचा विचार करायला नको काय?' आपण सर्वांशी मराठी माणसांच्या दु:खांचा व स्वप्नांचा विचार करायला नको काय? (नक्षत्रांचे देणे-गझलविशेष सी.डी) झंझावात या काव्यसंग्रहामध्ये आपणास त्यांच्या गझलांचा गाभा म्हणजे मानवी मनाचे चित्रण पहायला मिळते.

सामाजिक आशय असणाऱ्या द्विपदी

''त्या मैफलीत माझी होती कुठे हजेरी ?
ते धन्य धन्य झाले त्यांच्याच वाहवांनी !'' (झंझावात)

''कोणत्या न्यायालयी मी न्याय मागायास जाऊ ?

मी जिथे गेलो, तिथे 'रामशास्त्री' चरत होते !'' (झंझावात)

''काढा ! खुशाल काढा जेवून ग्रंथदिंडी !
झाले पवित्र केव्हा नालीमधील पाणी ?'' (झंझावात)

''भंगलेल्या दैवतांना घालता माळा कशाला ?
हाय, घोटाळ्यात आता 'ब्रह्मघोटाळा' कशाला ?'' (झंझावात)

सामाजिक आशय असणाऱ्या गझलांमधून भटांनी उच्च-वर्णीय, उच्चभू वर्ग, उंची, नोकऱ्यांवर असणारे विद्वान, सत्ता हा केंद्रबिंदू मानणारे राजकारणी, कृती न करता नुसते बोलणारे, क्रांतीकारक – समाजसुधारक, स्वत:चे संतत्व हरवून बसलेले संत ह्या समाजातील जबाबदार म्हटल्या जात असलेल्या लोकांचा ढोंगीपणा कधी सरळ, साध्या व थेट पद्धतीने; तर कधी उपरोध – उपहास ह्यांचा अवलंब करून उघडकीस आणलेला आहे.

आत्मचिंतनपर आशय असणाऱ्या गझलांमध्ये भटांनी आत्मप्रेमाविषयीचे चिंतन केले आहे. गझलकारही आत्मप्रेमी असतो त्यांचे स्वत:वर प्रेम असते. त्याला स्वत:चा अभिमान वाटतो. हा अभिमान कवी आपल्या काव्यात व्यक्त करीत असते. सुरेश भटांच्या गझलांचा अभ्यास करताना असे जाणवते की, भट स्वत: आपण व आजूबाजूचे इतर लोक ह्यांतील परस्पर संबंध सतत शोधण्याचा प्रयत्न करतात. इतर लोकांकडून आलेले अनुभव गझलांच्या माध्यमांतून व्यक्त करतात.

उदा – ''हा ठोकरून गेला, तो वापरून गेला
जो भेटला मला तो वांधा करुन गेला।'' (एल्गार)

''ह्याच आनंदात माझा प्राण गेला
कापला ज्याने गळा तो यार होता।'' (एल्गार)

''गांजले ज्यांनी मला ते शेवटी माझेच होते
हा कळीचा दंश होता ! तो फुलांचा वार होता !'' (एल्गार)

''काय माझ्या मालकीचे अर्थ होते ?
शब्द माझे भाबडे हुरळून गेले ! (एल्गार)''

आत्मचिंतनपर आशय असणाऱ्या गझलांमधून सुरेश भटांनी ढोंगी, खोट्या लोकांवर प्रहार केलेला जरी दिसत असला तरी जे सर्वसामान्य लोक आहेत त्यांच्याविषयी त्यांना कणव आहे असे दिसते.

सुरेश भटांनी निसर्गचित्रण करणाऱ्या, राजकीय आशय असणाऱ्या, देशभक्तीपर,

आध्यात्मिक आशय असणाऱ्या; प्रासंगिक आशय असणाऱ्या गझल लिहिल्या आहेत.

उदा – ''पावसावाचून हेही नक्षत्र कोरडे गेले . . .
हाय, पंचांगाप्रमाणे हे सुगीचे साल नाही !'' (झंझावात)

समाजातील विसंगती, दंभ, ढोंग, अन्याय, विफलता यांची त्यांनी फारच चांगली अभिव्यक्ती केली आहे.

'पुन्हा यंदा सभा झाल्या . . . पुन्हा नेते जमा झाले . . .
पुन्हा त्यांनी उधारीची मिठाई वाटली बाबा'! (झंझावात)

'लागली खुर्च्यांस पापी वैभवाची वाळवी
ऐकतो हा देश ज्यांचा बोलबाला सारखा'!

देशभक्तीपर आशय असणाऱ्या गझलांमधून त्यांचे देशावरील प्रेम व्यक्त झाले आहे. जे देशासाठी लढले त्यांच्याबद्दल ते अभिमान व्यक्त करतात, आजची देशाची स्थिती पाहून ते अस्वस्थ होतात.

उदा – 'खोऱ्यात सुखाच्या जेव्हा रंगल्या लढयाच्या चर्चा
मी रस्त्यावर बंडाचा ध्वज उंच उभारत होतो!' (सप्तरंग)

'मी कोणत्या अभागी देशात जन्मलो ?
प्रेतास येथल्या मी उठवायचे किती ? (सप्तरंग)

जात कैसी ? धर्म कैसा ? कोणती भाषा कुणाची ?
प्रश्न मी केले असे अन् मारलो गेलो कितीदा ! (सप्तरंग)

सुरेश भटांच्या गझलकाव्याचे वाङ्‌मयीन विशेष पाहताना गझलचे रचनातंत्र, नाट्यपूर्ण विरोधाभास, शब्दयोजनेतील चातुर्य, प्रतिमा, भाषाशैली, मराठीभाषेचा अभिमान, वाक्प्रचार व म्हणी यांचा केलेला प्रभावी वापर इ. बाबी निदर्शनास येतात.

उदा– विरोधाभास असणाऱ्या द्विपदी –

'चोरबाजारात इथल्या जपून मी फिरलो जरी
ते हिरावत राहिले अन् मी गमावत राहिलो !' (रंग माझा वेगळा)

'जगत मी आलो असा की, मी जसा जगलोच नाही !
एकदा तुटलो असा की, मग पुन्हा जुळलोच नाही !' (रंग माझा वेगळा)

महाराष्ट्र आणि मराठी भाषा यावर सुरेश भटांचे मनस्वी प्रेम होते. व्रतस्थपणे ते मराठीतून काव्यरचना करीत राहिले. मराठी भाषेविषयीचा हा अभिमान त्यांच्या गझलांमधून ओसंडून वाहताना दिसतो.

'साय मी खातो मराठीच्या दुधाची

मी उंबरा झिजवू कशाला?' (एल्गार)

'हा मराठी वैखरीच्या अमृताचा पूर आहे!

हा फिरंग्यांच्या गटारी वाहणारा माल नाही!' (झंझावात)

यासारख्या गझलांतून त्यांनी मराठीवरचे प्रेम व्यक्त केले आहे. त्यांच्या गझलांमध्ये जे मोठेपण त्यांना मिळाले, त्याहून कितीतरी मान मराठी काव्याला मिळाला.

मंगेश पाडगांवकर हे बालकवी – तांबे – बोरकर ही कवीपरंपरा पुढे चालवणारे, समृद्ध करणारे एक आघाडीचे कवी म्हणून ओळखले जातात. त्यांनी आजपर्यंत विपुल प्रमाणात काव्य लेखन केले आहे. पाडगांवकरांची बरीचशी कविता मुक्तछंद व मुक्तपद्य या पद्धतीची असली तरी छंदबध्द कविताही तितक्याच सहजतेने लिहिण्याचा त्यांचा लौकिक आहे. भावकविता, गीत, दीर्घ कविता, संगीतिका, बालगीत, वात्रटिका, उपहासिका इ. रचनेचे अनेक प्रकार त्यांनी हाताळले आहेत. काव्याच्या माध्यमातून स्वत:ला शोधण्याचा आणि व्यक्त करण्याचा त्यांचा नित्य प्रयत्न असला तरी, कोणत्याही एका प्रकारात स्वत:ला कायमचे जखडून ठेवण्याचे त्यांनी नाकारले आहे. अभिजात सौंदर्यदृष्टी, तिला प्रयोगशीलतेचा असलेला ध्यास, अनुरुप अशी वेगळी शब्दकळा कविमनाला जे जाणवले ते अपरिहार्यपणे प्रकट करण्याची ओढ हे सगळे विशेष एकवटलेले असल्यामुळे पाडगांवकरांची कविता नेहमीच आकर्षणाचा विषय ठरली.

मंगेश पाडगांवकर आपल्याला आलेला अनुभव कलात्मकरित्या व्यक्त करतात. तो अनुभव व्यक्त करण्याची त्यांची जी तळमळ आहे. त्या तळमळीलाच त्यांच्या काव्यलेखनामागील प्रेरणा म्हणावे लागेल. 'छोरी' च्या प्रस्तावनेत पाडगांवकर म्हणतात, निर्मितीची प्रक्रिया गूढ असून तिचे स्वरुप अजूनही समजले नाही. एखाद्या हिरव्यागार पात्याने मातीचे कवच भेदून वर यावे तसे मनात कुठेतरी रूजलेल्या अनुभवांचा क्षण प्रकट होतो. तो कसा प्रकट होतो याचे रहस्य त्यांनाही समजले नाही. ते म्हणतात. तो क्षण अपरिहार्य आणि अनपेक्षित असतो.

मंगेश पाडगावकरांनी गीत, वात्रटिका, उपहासिका अशा विविध प्रकारचे काव्यलेखन केले आहे. या काव्यलेखनामागे त्यांची असलेली काव्यनिष्ठा दिसून येते. पाडगांवकरांच्या सर्व काव्यग्रंथांपैकी 'गझल' (१९८१) हया एकाच कवितासंग्रहामध्ये त्यांची सर्व गझलरचना आढळते. या काव्यसंग्रहामध्ये एकूण ८५ गझलांचा समावेश आहे. या काव्यसंग्रहातील गझलांमध्ये उदा. गझलांप्रमाणेच पाडगावकरांनी शीर्षक न देता क्रमांक दिलेले आहेत.

पाडगांवकरांनी गझलसंबंधी माधव जूलियनांच्या विचारसरणीचे अनुकरण केले. त्यामुळे साहजिकच त्यांच्या गझलांमध्ये माधव जूलियन यांच्या गझलरचनेतील त्रुटी दिसतात, पण पाडगांवकरांच्या गझलांचा अभ्यास करताना एक प्रश्न पडतो. तो म्हणजे पाडगांवकरांनी जूलियनांचे रचनातंत्र वापरले आहे. मग गझलला 'गज़्ल' असे नाव न देता 'गझल' हे नाव आपल्या काव्यसंग्रहाला का दिलं असावं? माधव जूलियनांनी गझल हा शब्द 'गज़्ल' असा परिचित करून दिला. त्याचबरोबर तो पुल्लिंगी शब्द म्हणून वापरला. पाडगांवकरांनीही हा शब्द पुल्लिंगी म्हणूनच वापरला. आपल्या गझलरचनेसंबंधी पाडगांवकर म्हणतात.

'गझल' या काव्यसंग्रहातील बहुतांश गझला नेहमीच्या भावकवितेप्रमाणे झालेली आहे. केवळ गझलचा आकृतिबंध वापरल्याचा अनुभव येतो. अक्षरगणवृत्तामंधील रचना असताना एका गुरू अक्षरांऐवजी दोन लघु अक्षरांची योजना करून त्याला मात्रावृत्ताचे स्वरूप देणे, गझल अक्षर छंदात रचणे, शेवटपर्यंत एकाच वृत्तात गझल रचणे, द्विपदींची संख्या कमीत कमी पाच नसणे, यमक योजना तंत्रशुदध नसणे यासारख्या उणीवा रचनातंत्राच्या बाबतीत जाणवतात.

पाडगांवकरांनी आपल्या गझलांमधून प्रेमभावना, सामाजिक निसर्गचित्रणपर, आत्मचिंतनपर, वर्णनात्मक, कथनपर, राजकीय आशय असणाऱ्या व काव्यविषयक आशय असणाऱ्या गझल इ. विषय मांडले आहेत. या विषयावरील गझलांमध्ये प्रारंभापासून शेवटपर्यंत एकच विषय हाताळलेला पहायला मिळतो. शिवाय स्वयंभू - स्वयंपूर्ण - स्वतंत्र द्विपदींचा अभाव त्यांच्या गझलांमध्ये जाणवतो. प्रेमभावना व्यक्त करणाऱ्या गझलांमधून प्रेमभावनेच्या विविध छटा, अत्यंत हळूवारपणे, उत्कटपणे व गेयतापूर्ण पद्धतीने व्यक्त करीत आले आहेत. सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या गझलांमध्ये पाडगांवकरांनी स्वातंत्र्योत्तर भारतातील घडामोडींचे चित्रण केले आहे. राजकीय, सामाजिक, धार्मिक, साहित्यिक परिस्थितीचा भारतीय समूहमनावर व व्यक्तीमनावर जो परिणाम झाला. त्याचे अस्वस्थ करणारे चित्रण केलेले आहे. समाजातील परिस्थितीचा कवीवर व समाजावर झालेला परिणाम पाडगांवकरांना अस्वस्थ करतो. आता पूर्वीप्रमाणे माणूस राहिलेला नाही. ही खंत पाडगांवकर व्यक्त करतात. गर्दीत वावरत असूनही एकटेपणाचे दुःख आपण भोगत आहोत असे कवीला वाटते. असे काहीसे निराशाजनक चित्रण पाडगावकरांनी आत्मचिंतनपर गझलांमधून केले आहे. याशिवाय निसर्गचित्रणपर, कथानकपर, वर्णनात्मक गझलही पाडगांवकरांनी लिहिल्या आहेत.

मंगेश पाडगांवकर यांच्यावर माधव जुलियन पद्धतीच्या गझलांचा प्रभाव असल्याने

माधव जूलियनांच्या प्रमाणेच त्यांनीही गझलच्या रचनातंत्राविषयीची बंधने पाळली नसल्याचे जाणवते.

पाडगांवकरांनी आपल्या गझलांमध्ये प्रतिमा, वाक्प्रचार व म्हणी यांचा प्रभावी वापर केल्याचे दिसते. निसर्गातील विविध प्रतिमांमधून त्यांच्या मनातील सृजन क्षणांचा अविष्कार घडवितात. निसर्गातील सौंदर्य ते अचूकपणे व सूक्ष्म नजरेने टिपतात. हे सौंदर्य त्यांच्या नवनव्या प्रतिमांतून प्रकट होते.

प्रेमभावना व्यक्त करणाऱ्या गझलांमध्ये प्रेमभावनेच्या विविध छटा अत्यंत हळूवारपणे, उत्कटतेने व गेयतापूर्ण पद्धतीने व्यक्त केल्या आहेत. या गझलांमधून प्रीतीतील ओढ, सहवास, मुग्धता, मीलन ह्या सर्व भाव छटा उत्कटतेने व्यक्त झाल्या आहेत. एकमेकांच्या सहवासात घालवलेला काळ, त्यावेळी घेतलेल्या शपथा व वचने त्यांच्या गझलांमध्ये चित्रित केलेल्या आहेत ही चित्रणे करताना त्यांनी निसर्गातील प्रतिमांचा वापर केला आहे. 'गझल' या काव्यसंग्रहातील बहुतांश रचना बऱ्याच प्रमाणात पाडगांवकरांच्या नेहमीच्या भावकवितेप्रमाणे झालेली आहे. मंगेश पाडगांवकरांच्या प्रेमभावना व्यक्त करणाऱ्या द्विपदी पुढीलप्रमाणे.

'वाट होती आंधळी अन् भोवती अंधार होता.
हात तू हाती दिला ग ड एक हा आधार होता' (क्र.९)

'कटाक्षांची तिची दुनिया, तिचे ते श्वास मायावी
विषाची कां कळेना त्या जिवाला प्यास लागावी' (क्र.१९)

सामाजिक आशय असणाऱ्या गझलांमध्ये स्वातंत्र्योत्तर भारतातील बदलत गेलेल्या राजकीय–सामाजिक–धार्मिक–साहित्यिक वगैरे परिस्थितीचा समाजावर जो विघातक परिणाम होत गेला. त्याचे अस्वस्थ व अंतर्मुख करणारे चित्रण त्यांनी केले आहे.

सामाजिक आशय असणाऱ्या काही द्विपदी पुढीलप्रमाणे

'कोलाहलात साऱ्या माणूस शोधतो मी
गर्दीत माणसांच्या माणूस शोधतो मी' (क्र.१)

'जमलेत सर्व सौदे सौदा इथे कराया
विकतील बाप आई हे तुंबडी भराया.' (क्र.४६)

प्रेम आणि निसर्ग जाणिवा व्यक्त करणाऱ्या गझलांपेक्षा त्या गझला अधिक उत्कट, प्रभावी, परिणामकारक व यशस्वी वाटतात. तसेच आशय नावीन्य, त्यातून सर्वांच्या आजूबाजूचे व्यक्त झालेले वास्तव, त्याविषयीची सर्वांच्या मनातील व्यक्त झालेली प्रातिनिधिक स्वरूपातील सहज स्वाभाविक बोलकी प्रतिक्रिया व गझलेच्या सर्व

रचनातंत्राची बऱ्याच यशस्वीपणे केलेली हाताळणी ही सर्व वैशिष्ट्ये पाडगांवकरांच्या सामाजिक आशय असणाऱ्या गझलांमध्ये पहायला मिळते.

याशिवाय आत्मचिंतनपर आशय असलेल्या गझलांमध्ये आत्ममग्नता प्रकट झाली आहे. अनेकदा ती आत्मसंवादात आणि आत्मशोधात रमली आहे असे दिसते. पराभूतता, उद्विग्नता, घोर निराशा, आत्मकरूणा, आत्मनिंदा अशा अनेक सूक्ष्म छटा या प्रकारच्या गझलांमध्ये भरून राहिलेल्या जाणवतात.

उदा.,

'आलो इथे कशाला माझे मला कळेना
या बेगडी जगाशी हा सूरही जुळेना' (क्र.१२)

'संपवोनी बाल्य माझे दुःख झाले जाणते
भेटते आता सुखाला, हास्य ओठी आणते'. (क्र.४०)

आपण इथे कशाला आलो? असा प्रश्न कवीला पडलेला आहे. कारण बेगडी जगाशी आपला सूर जमेना असे कवी म्हणतो.

याशिवाय इतर विषयांवरील गझलांही पाडगांवकरांनी लिहिल्या आहेत. त्यामध्ये निसर्गचित्रणपर, राजकीय आशय असणाऱ्या, काव्यविषयक, वर्णनपर आशय असणाऱ्या गझल लिहिल्या आहेत.

मंगेश पाडगांवकरांच्या गझलकाव्यांचे वाङ्मयीन विशेषांमध्ये नाट्यपूर्ण विरोधाभास, शब्दयोजनेतील चातुर्य, प्रतिमा, भाषाशैली, वाक्प्रचार, इत्यादींचा परिणामकारक वापर केल्याचे पहायला मिळते.

सुरेश भट आणि मंगेश पाडगांवकर यांच्या गझल काव्यातील साम्यभेद पाहताना पुढील बाबी लक्षात येतात.

सुरेश भट व पाडगांवकर यांच्या प्रेमभावना, सामाजिक, आत्मचिंतनपर, निसर्गचित्रणपर, काव्यविषयक, राजकीय आशय असणाऱ्या गझलांच्या विषयांमध्ये साम्य दिसून आले. याशिवाय गझलांमध्ये असणारा नाटयपूर्ण विरोधाभास, गझलांमध्ये केलेला वाक्प्रचार व म्हणी यांचा वापर, इतर भाषेतील शब्दांचा वापर, गझलांमधील द्विपदीमध्ये असणारे साम्य व कवीचे असलेले तीव्र संवेदनशील मन या बाबींमध्ये साम्य दिसून आले. तर भेदामध्ये विषयाच्या बाबतीत सुरेश भटांच्या प्रासंगिक, आध्यात्मिक आशय असणाऱ्या गझला आहेत. तर पाडगांवकरांच्या वर्णनात्मक व कथानकपर गझला आहेत. याशिवाय शीर्षकातील भेद, गझल लेखनामागील प्रेरणा, रचनातंत्रविषयक विचार, प्रतिमांमध्ये असलेला भेद व मंगेश पाडगांवकर व सुरेश भटांच्या गझल कार्याचा आढावा घेता येतो.

वरील सर्व निष्कर्षांतून हे सिद्ध होते की, सुरेश भटांची गझल मंगेश पाडगांवकरांच्या गझलेपेक्षा उच्च दर्जाची आहे. हा दर्जा ठरविताना सुरेश भटांच्या गझलांतील आशय, रचनातंत्र, शब्दयोजनेतील चातुर्य, वाक्प्रचार, व म्हणी, प्रतिमा यांचा केलेला प्रभावी वापर, गझलला अनुरुप असे विषय यांचा विचार केला. यावरून सुरेश भटांचे एकूण मराठी गझलमध्ये किती महत्त्वाचे स्थान आहे हे लक्षात येते. पाडगांवकरांच्या गझलांसंबंधी असे म्हणता येईल की निसर्गकाव्यामध्ये व भाव कवितेमध्ये यशस्वी झालेल्या पाडगांवकरांना गझललेखनामध्ये मात्र अपयश आले.

संदर्भ ग्रंथ सूची

१. प्रा. डॉ. कांबळे अविनाथ, मराठी गझल : १९२० ते १९८५, नीहारा प्रकाशन, प्रथमावृत्ती १२ जून, १९९५ पृ. ४१.
२. तत्रैव, पृ. ४२.
३. संपा. प्रा. देसाई संभाजीराव, युवकमुद्रा, दिवाळी अंक, १९८६, पृ. ६५.
४. तत्रैव, पृ. ६५
५. भारतीय संस्कृतिकोश, भारतीय कोश मंडळ, पृ. ६९६.